ISSN 2394-5303

UGC Approved Refereed Journal Jr.No.43053

# Printing Area™

International Multilingual Research Journal

Issue-33, Vol-01, September 2017



Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

27) नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कृषी योजना - एक अभ्यास
डॉ. के. के. पाटील-स्वाती कुरमे, || 123

28) यशवंतराव चव्हाण यांचे वैचारिक नेतृत्त्व
डॉ. पंडित महादेव लावंड, बार्शी || 125

29) शिवकालीन आरमार
प्रा. डॉ. कृष्णा मालकर, देवगाव(रं), औरंगाबाद. || 130

30) ग्रामीण भूमिहीन मजुरांच्या समस्या आणि उपाय योजना
प्रा. राठोड बी. जे.. ता. पाटोदा जि. बीड. || 133

31) यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समुदायाची सामाजिक वैशिष्ट्ये
डॉ. एन. के. सोरे, पांढरकवडा || 136

32) भारतीय भाषाओं का अंत:संबंध
डॉ. विश्वनाथ किशन भालेराव, जि.लातूर (महाराष्ट्र) || 139

33) संस्कृत–हिन्दी व्याकरण का तुलनात्मक अध्ययन
गजानन धरेन्द्र, जनकपुरी, नई दिल्ली || 141

34) टीवी समाचार चैनलों पर समाचार प्रस्तुतिकरण का तुलनात्मक अध्ययन
—डा. योगेश कुमार गुप्ता, जयपुर || 146

35) माता आनन्दमयी पीठ इन्दौर में आने वाले ग्रामीण एवं शहरी क्षेत्र के ------
डॉ. भारती कौशिक, श्यामपुर ऋिषिकेश || 153

36) स्त्री विमर्श की परम्परा महादेवी वर्मा के सन्दर्भ में
डा० मुखत्यार सिंह, काशीपुर || 155

37) वैश्वीक परिप्रेक्ष्य में सन्त तुकाराम के विचारो का महत्व
प्रा. डॉ. रेविता बलभीम कावळें,बसमत जि. हिंगोली || 158

38) 'निराला' के काव्य में प्रगतिशील चेतना
प्रा.डॉ. डी.व्ही. गिरि, परतूर || 162

39) संस्कृत की महत्ता और रोजगार के अवसर
डॉ. संगीता मेहता, धार, मध्य प्रदेश || 164



www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

31

# यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समुदायाची सामाजिक वैशिष्ट्ये

डॉ. एन. के. सोरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. बा.दे.पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

**********

**प्रस्तावना :**

आदिवासी समाजाचा अभ्यास करतांना त्या समाजाच्या विभिन्न पैलूंचे अध्ययन करणे आवश्यक ठरते. या जमातींच्या समुदायाची रूपरेषा अभ्यासाण्यासाठी विविध घटकांचा प्रामुख्याने आदिवासींचे राहणीमान, बोलीभाषा, त्यांच्या चालीरिती, प्रथा-परंपरा, विवाह पध्दती, त्यांची संस्कृती इ. बाबींचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

आदिवासी समाजाच्या अभ्यासाला एक आंतरिक मूल्य आहे. आदिम समजाची जीवनपध्दती, मुल्ये, श्रध्दा, आचार-विचार अगदीच अनन्य स्वरूपाचे असतात. आधुनिक सुविधा नसतांनाही डोंगर कपाऱ्यात राहणाऱ्या, नद्यानाल्यात वावरणाऱ्या वन्य जमातीचे विश्व अगदीच वेगळे असते. त्यामुळेच तर आदिम समाजाचे अध्ययन अधिक उद्बोधक ठरते. आपल्या वेगळ्या जीवनाचा व जीवनपध्दतीचा विलक्षण अभिमान आदिमांना वाटत असतो. त्याच्या रीतीरिवाजावरून त्यांच्या समाधानी जीवनाचे दर्शन घडून येते. शिकार या परंपरागत व्यवसायात धनुष्यबाण घेऊन सर्वत्र जंगलात वावरणाऱ्या या आदिम जमातीत त्यांच्या परंपराबद्दलचा अभिमान दिसून येतो.

**जिल्ह्यातील आदिवासी समुदायाची सामाजिक वैशिष्ट्ये:**

संपूर्ण भारतभर पसरलेल्या आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये समान असून महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्हा ही याला अपवाद नाही. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समुदायाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आढळून येतात-

**१) सामाजिक संघटन**

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जीवन हे अनेक रूढी, परंपरांनी व्यापलेले आहे. आदिवासींचे कुटुंब, विवाह, वेशभूषा, आवास, मार्मिक प्रथा, खानपान इत्यादी प्रत्येक घटकांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण लक्षणे आढळून येतात. तसेच जंगलातील कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे, लाकडे, डिंक वनौषधी इ. गोळा करणे, अशी कामे करून हे लोक आपले जीवन जगत आहेत.

**२) कुटुंब व्यवस्था-**

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासींमध्ये पितृसत्ताक आणि पितृवंशीय कुटुंब पद्धती अस्तित्वात आहे. यांच्यात पितृसत्ताक कुटुंब पद्धती असली तरी त्यांच्यावर मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचा प्रभाव आढळून येतो. मुलगी झाली की त्यांना विशेष आनंद होतो. त्यामुळे मुलीच्या आई-वडिलांना मुलाच्या पक्षाकडून वधूमूल्य दिले जाते. आदिवासींमध्ये विभक्त कुटुंब पद्धती असून विवाहानंतर मुलगा स्वतंत्र राहतो. पत्नीला तसेच अविवाहित मुलांना वारसा हक्क मिळतो. मात्र तो मुलींना मिळत नाही.

**२) आदिवासींची पंचायत**

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समुदायामध्ये पंचायत विशेष महत्त्वाची भूमिका पार पाडत असून जिल्ह्यातील आदिवासी जमातीत उद्भवणारे तंटे सोडविण्याचे व न्यायदान करण्याचे कार्य ही पंचायत करते. या पंचायतीची रचना अभ्यासता असे आढळून येते की, गावातील वृद्ध तसेच प्रमुख लोक पंचायतांचे सभासद असतात. जाती पंचायतीमध्ये साधारणतः सहा सदस्य असतात. त्यामध्ये प्रधान, भूमका, पडिहाल, जातीय पटेल, दोन पंच प्रधान इ. चा समावेश असतो. यापैकी भूमका आणि पडिहाल हे दोन पंथ वंश परंपरागत असतात व ते धार्मिक अनुष्ठानाचे कार्य करतात. जाती पटेल या पदाची निवड जातीतील सर्व व्यक्ती मिळून केली जाते. हे पद स्थायी किंवा अस्थायी स्वरूपाचे असून एका किंवा अनेक गावांमिळून होणाऱ्या गटाकरीता असते. इतर दोन सदस्यांची निवड प्रधान आणि भूमिका मिळून करतात. पंचायतचा सहावा किंवा शेवटचा सदस्य म्हणून चौधरी असतो. हा पंचायतीचा नोकर असून सण-उत्सवाचे वेळी सर्व कामे तोच करतो. सामाजिक समारंभाचे वेळी तसेच भावभेटीसाठी पाहुणे व अधिकारी येतात तेव्हा सर्व प्रकारची अंगमेहनतीची कामे त्यालाच करावी लागतात.

धर्माच्या प्रभावामुळे अलीकडे लावू लागल्या आहेत.

आदिवासी स्त्रियांमध्ये दागिन्यांना विशेष महत्त्व आहे. त्यांच्यामध्ये प्रामुख्याने सुत्रापायरी, बिछवा, मुंदी, कुडा, निगडी, पायपट्टी (पैजण), मच्छी ही मुख्य दागिने होत. तसेच नाकात बेसर, कानात कर्णफूले, अंगठ्या आणि बांगड्या इत्यादी दागिने आदिवासी स्त्रिया घालतात. हे दागिने सामान्यत: पितळाचे किवा जर्मनचे असतात. आर्थिक स्थिती चांगली असलेल्या घरातील स्त्रिया चांदीचे दागिने घालतात.

५) **निवासस्थान** यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासींची खेडी ही रस्त्यांच्या बाजूला असून त्यांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. २० ते २५ घरांमिळून एक खेडे किंवा पाडा असतो. घरे ही समांतर रांगामध्ये असून दोन रांगाच्या मधोमध रस्ता असतो. घराला मातीचा ओटा असून लाकडे व गवतापासून तयार केलेली झोपडी असते. घराच्या भिंती ह्या लाकडी किंवा शेणाने सारवलेल्या असतात. अनेक ठिकाणी घरातील भिंतीवर आतील बाजूस फूलचिन्हांची चित्रेही काढलेली असतात. तसेच विविध देवदेवतांची फोटो लावलेली असतात. घराचे छत हे कमी उंचीचे असून त्यावर झाडाची पाने किंवा गवत टाकून ते पूर्णपणे झाकलेले असते. अलीकडे गावरानी किंवा मंगलोरी कवलेसुद्धा आढळतात. सधन कोरकूंची घरे ही विटाच्या भिंतीची असून वर टिनाचे छप्पर किंवा क्वचित सिमेंटचा स्लॅब असतो.

६) **आहार** : यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासींच्या आहारामध्ये प्रामुख्याने दोन्ही प्रकारच्या (शाकाहारी व मासाहारी) आहाराचा समावेश होतो. शाकाहारी आहारामध्ये ज्वारी, बाजरी, कुटकी, मोहाची फूले, फळे, कंदमुळे यांचा समावेश होतो. आदिवासी प्रामुख्याने ज्वारीची भाकरी खातात किंवा ज्वारीचे आंबिल पितात. या आंबिलाला हाळे किंवा पेजो असे म्हणतात. मोहाची फूले भाजून किंवा टाकून या पेजोसह खाण्यात येतात. कुटकी हे तृणधान्यही ते खातात. मांसाहारी आहारामध्ये डुक्कर, म्हैस यांचे मास खातात तसेच मासे, खेकडे, कोंबडा, पक्षी इ.चा आहारामध्ये समावेश होतो. सामान्यत: आदिवासी लोक गोमास भक्षण करीत नाहीत व ज्या आदिवासींनी गोमास खाल्ले असेल त्यांना घ्गोयेराङ असे नाव देऊन त्यांना जातीबाहेर टाकतात व कनिष्ठ समजतात. सण-उत्सव व आनंदाचे वेळेस स्त्री-पुरुष हे दारूचे सेवन करतात. सामान्यपणे मातीची भांडी किंवा सुखलेले भोपळे यांची भांडी म्हणून उपयोग होतो. मोठ्या घेराचे पोकळ बांबू कापून त्यांचा बाटलीसारखा उपयोग केला जातो. साधारण बऱ्या परिस्थितीत आदिवासी हे जर्मन किंवा पितळीची भांडी वापरतात. तसेच झाडाच्या पानाच्या पत्रावळी व द्रोणचाही वापर दैनंदिन जीवनात केला जातो.

शुद्ध पिण्याचे पाणी ही कोरकूंसमोरील मोठी समस्या असून आदिवासी भागातील सर्व खेड्यांना वर्षभर शुद्ध पेयजल मिळत नाही. काही ठिकाणी विहिरी व टयुबवेल्स उपलब्ध आहेत. परंतु बऱ्याच खेड्यांना १ ते ४ मैलापर्यंत दूर असलेल्या नाल्यावरून किंवा नदीवरून पाणी आणावे लागते.

७) **आदिवासींची शेती व अर्थव्यवस्था :**

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासींचा मुख्य व्यवसाय हा शिकार असून बहुतांश आदिवासी हे शेती करतांना दिसतात. परंतु आदिवासी वास्तव्य करतात त्या विभागातील जमिन मुरमाड व शेतीसाठी निकृष्ट असून डोंगरावर असल्याने उतारावरील शेते जास्त आहे त्यामुळे जमिनीमध्ये पाणी टिकून राहत नाही. नद्या, नाले, तलाव आणि सिंचनाच्या सोयीचा अभाव आहे. त्यामुळे फारच कमी उत्पन्न निघते. हे लोक मुख्यत: ज्वारी, मका व कोदो, कुटकी, सावऱ्या ही पिके घेत असून अल्पभुधारकच जास्त असल्याने साधारणपणे आदिवासी दरिद्रीच आढळतो. स्थानिक किंवा जवळच्या भागात रोजगाराच्या संधी अत्यल्प असल्याने कुंटीरोद्योग व लघुउद्योगांचाही अभाव आहे. त्यामुळे बेरोजगारीही मोठ्या प्रमाणावर आढळते. मजुरीसाठी पती-पत्नीला दूर जावे लागते. त्यामुळे कुटुंबाची व लहान मुलांची हेळसांड होते.

**संदर्भ**


१. 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', (मार्च २०१२), जिल्हा सांख्यिकीय कार्यालय यवतमाळ.

२. देवगावकर डॉ. शैलजा., देवगांवकर, डॉ. शं. गो. (२००१):'आदिवासी विश्व', पृष्ठ क्रं. ४८.

३. देवगावकर डॉ. एस. जी. (२००१):'महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती',पृष्ठ क्रं. २४८.

४. गिरासे प्रा. एस. पी. (जूलै-सप्टेंबर १९९४) : 'हाकारा-वर्ष पंधरावे अंक तिसरा'


❑❑❑